# अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक, (वन्यजीव) पुर्व, नागपूर

# माहिती अधिकार अधिनियम २००५

## कलम ४ प्रमाणे प्रदर्शित करावयाची माहिती

# अनुक्रमणिका


| अ.क्र. | विषय | पृष्ठ संख्या |
|---|---|---|
| १ | कार्यालयाची रचना, कार्य व कर्तव्ये | ३ - ९ |
| २ | अधिकारी व कर्मचा-यांचे अधिकार व कर्तव्ये | १० - १४ |
| ३ | निर्णय घेण्याची कार्यपध्दती, पर्यवेक्षण व उत्तरदायित्व प्रणाली | १४ |
| ४ | कामाचे निकष | १५ - १६ |
| ५ | कार्ये पार पाडण्यासाठी वापरावयाचे नियम/कायदे | १७ |
| ६ | विभागामधील कागदपत्रांच्या वर्गवारीचे विवरणपत्र | १७ |
| ७ | धोरण तयार करण्याच्या किंवा अंमलबजावणी प्रक्रियेमध्ये जनतेच्या सहभागासाठी केलेली उपाययोजना | १८ |
| ८ | सल्ला देण्यासाठी स्थापन केलेली मंडळे/समित्या/परिषद याबाबतची माहिती | १८ |
| ९ | अधिकारी व कर्मचाऱ्यांची निर्देशिका | १८ |
| १० | प्रत्येक कर्मचा-यांचे मासिक वेतन, प्रतिपुर्ती बाबतची कार्यपध्दती | १८ |
| ११ | सर्व योजनांचा तपशिल प्रस्तावित खर्च अर्थसंकल्प संवितरण रक्कम | १९ - २१ |
| १२ | लाभार्थीबाबतची माहिती | २१ |
| १३ | ज्या व्यक्तींना सवलती पध्दत लाभार्थीबाबतची माहिती | २१ |
| १४ | इलेक्ट्रॉनिक स्वरुपात उपलब्ध असलेली माहिती | २२ |
| १५ | लायब्ररीसह नागरिकांना माहिती मिळण्यासाठी दिलेल्या सुविधा | २२ |
| १६ | वन्यजीव, नागपूर वनवृत्तातील माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी यांची नावे व पदनामे | २३ |
| १७ | इतर माहिती | - |

# १. कार्यालयाची रचना, कार्य व कर्तव्ये

अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव) पुर्व, नागपूर कार्यालय व त्यांचे अधिपत्याखालील कार्यालयातील रचना पुढे दर्शविल्याप्रमाणे आहे.




A
अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव)
क्षेत्रीय कर्मचारी
कार्यालयीन कर्मचारी
सहाय्यक वन संरक्षक (वन्यजीव)
तांत्रिक सहायक (वनपरिक्षेत्र अधिकारी)
सर्व्हेक्षक
कार्यालयीन अधिक्षक
मुख्य लेखापाल
लेखापाल
लिपीक


B
मुख्य वनसंरक्षक तथा क्षेत्रसंचालक, पेंच
क्षेत्रीय कर्मचारी
कार्यालयीन कर्मचारी
सहायक वनसंरक्षक, पेंच
सहायक वनसंरक्षक, सेलु घटक
मुख्य लेखापाल
वनपरिक्षेत्र अधिकारी, पुर्व पेंच
वनपरिक्षेत्र अधिकारी, पश्चिम पेंच
वनपरिक्षेत्र अधिकारी, बोर
वनपरिक्षेत्र अधिकारी, टिपेश्वर
लेखापाल
लिपीक
शिपाई
वनपाल
वनपाल
वनपाल
वनपाल
वनरक्षक
वनरक्षक
वनरक्षक
वनरक्षक
वनपरिक्षेत्र अधिकारी, अवैध शिकार प्रतिबंधक घटक
वनरक्षक


C
मुख्य वनसंरक्षक तथा क्षेत्रसंचालक, ताडोबा-अंधारी
क्षेत्रीय कर्मचारी
कार्यालयीन कर्मचारी
सहायक वन संरक्षक
लेखापाल
लिपीक
शिपाई
वन्यप्राणी रक्षक ताडोबा
वनपरिक्षेत्र अधिकारी (संशोधन)
वनपरिक्षेत्र अधिकारी (वन्यजीव) मोहल्ली
वनपरिक्षेत्र अधिकारी (वन्यजीव) कोळसा
वनपरिक्षेत्र अधिकारी (संरक्षण) मोहर्ली
वनपाल
वनपाल
वनपाल
वनपाल
वनरक्षक
वनरक्षक
वनरक्षक
वनरक्षक


D
उप वनसंरक्षक (वन्यजीव), गोंदिया
क्षेत्रीय कर्मचारी
कार्यालयीन कर्मचारी
उपविभागीय वन अधिकारी, नवेगांव
सहायक वनसंरक्षक, नागझिरा
वनपरिक्षेत्र अधिकारी (स्वागत)
वनपरिक्षेत्र अधिकारी (प्रा)
वनपरिक्षेत्र अधिकारी (प्रा)
वनपरिक्षेत्र अधिकारी (संरक्षण)
लेखापाल
लिपीक
शिपाई
वनपाल
वनपाल
वनपाल
वनरक्षक
वनरक्षक
वनरक्षक
वनरक्षक


E
उप वनसंरक्षक (वन्यजीव),
आल्लापल्ली
क्षेत्रीय कर्मचारी
कार्यालयीन कर्मचारी
सहायक वनसंरक्षक
मुख्य लेखापाल
वनपरिक्षेत्र अधिकारी, चौडमपल्ली
वनपरिक्षेत्र अधिकारी, भामरागड
वनपरिक्षेत्र अधिकारी, संरक्षण पथक स्थित आलापल्ली
लेखापाल
लिपीक
वनपाल
वनरक्षक
वनरक्षक
वनरक्षक
शिपाई
वनरक्षक

## नागपूर वन्यजीव वृत्त एकूण वनक्षेत्र

| अ. क्र. | वन्यजीव विभाग | | एकूण वनक्षेत्र (चौ.कि.मी.) |
|---|---|---|---|
| १ | मुख्य वनसंरक्षक तथा क्षेत्रसंचालक, ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्प, चंद्रपूर | ताडोबा राष्ट्रीय उद्यान | ११६.५५ |
| | | अंधारी अभयारण्य | ५०८.२७ |
| २ | मुख्य वनसंरक्षक तथा क्षेत्रसंचालक, पेंच व्याघ्र प्रकल्प, नागपूर | पेंच व्याघ्र प्रकल्प | २५७.२६ |
| | | बोर अभयारण्य | ६१.१० |
| | | टिपेश्वर अभयारण्य | १४०.२९ |
| ३ | उपवनसंरक्षक (वन्यजीव), गोंदिया | नवेगांव राष्ट्रीय उद्यान | १३३.८८ |
| | | नागझिरा अभयारण्य | १५३.६६ |
| ४ | उपवनसंरक्षक, (वन्यजीव), आलापल्ली | चपराळा अभयारण्य | १३३.२३ |
| | | भामरागड अभयारण्य | १०४.३८ |
| | | **एकूण** | **१६०९.४३** |

सुरक्षित क्षेत्र निहाय वनक्षेत्रचा तपशिल (चौ.कि.मी.)

| अ. क्र. | सुरक्षित क्षेत्र | राखीव क्षेत्र | संरक्षित क्षेत्र | महसूल क्षेत्र | अवर्गीकृत क्षेत्र | खाजगी क्षेत्र | एकूण क्षेत्र |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्प | ५७७.९६ | ३२.५१ | ० | १४.९३ | ० | ६२५.४० |
| २. | पेंच व्याघ्र प्रकल्प | २५७.२६ | ० | ० | ० | ० | २५७.२६ |
| ३. | बोर अभयारण्य | ३२.३७ | २२.१३ | - | ६.६० | - | ६१.१० |
| ४. | टिपेश्वर अभयारण्य | १४०.२९ | ० | ० | ० | ० | १४०.२९ |
| ५. | नवेगांव राष्ट्रीय उद्यान | १२९.५५ | ४.३३ | ० | ० | ० | १३३.८८ |
| ६. | नागझिरा अभयारण्य | १५३.६६ | ० | ० | ० | ० | १५३.६६ |
| ७. | चपराळा अभयारण्य | ११८.८४ | ५.२९ | ० | ९.१० | ० | १३३.२३ |
| ८. | भामरागड अभयारण्य | १०४.३८ | ० | ० | ० | ० | १०४.३८ |
| | **एकूण** | **१५१४.३१** | **६४.२६** | **०** | **३०.६३** | **०** | **१६०९.२०** |

| अ. क्र. | सुरक्षित क्षेत्र | क्षेत्र चौकिमी. | नोटीफिकेशन क्रमांक व दिनांक |
|---|---|---|---|
| १. | ताडोबा राष्ट्रीय उद्यान | ११६.५५ | 1) MP/Act No. VII of Dated 31 March 1955 |
| | अंधारी अभयारण्य | ५०९.२७<br>४६१.७५ | 1) No. WLP-1085/CR-75/F-5 (III), dt.25/2/1986<br>2) WLP-10-2000/CR-193/F-1, Dt. 9/2/2001 |
| | ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्प | ६२५.४० | 1) WLP-1094/CR-225/F-1, dated 23/2/1995 |
| | Critical Tiger Habitat 625.82 Sqkm | | 1) WLP-10-07/CR-297/F-1, Dated 27/12/ 2007 |
| २. | पेंच राष्ट्रीय उद्यान | २५७.२६ | 1) PGS 1375/121758-F-1, dated 22/11/1975 |
| | पेंच व्याघ्र प्रकल्प | २५५.१२<br>२५५.१२ | First - WLP-1095/CR-110/F-1, dated 23/2/1999<br>Final – WLP-10-2000/CR-6/F-1, dt. 20/6/2000 |
| | Critical Tiger Habitat 257.26 Sqkm | | 1) WLP-10-07/CR-297/F-1, Dt. 27/12/2007 |
| ३. | बोर अभयारण्य | ६१.१० | WLP-1870/43126(a), dated 27/11/1970 |
| ४. | टिपेश्वर अभयारण्य | १४८.६३<br>१४०.२९ | First - WLP-1095/CR-84/F-1, dated 24/1/1997<br>Final -WLP-1095/CR-84/F-1, dated 30/4/1997 |
| ५. | नागझिरा अभयारण्य | १५२.८१<br>१५२.५८ | First - WLP-1969/228601-, dt 3rd June 1970<br>Final-WLP-10-2000/CR-185/F-1,Dt.23/7/2001 |
| ६. | नवेगांव राष्ट्रीय उद्यान | १३३.८८<br>१२९.५५ | First- PGS-1375/121758-FL, dt. 22/11/1975<br>Final- WLP-10/2000/CR-192/F1, dt. 20/12/2000 |
| ७. | भामरागड अभयारण्य | १०४.३८ | WLP-1096/CR-127/F-1, dated 6/5/1997 |
| ८. | चपराळा अभयारण्य | १३४.७८ | WLP-1085/CR-75/F-5(v), dated 25/2/1986 |

## २. अधिकारी व कर्मचा-यांचे अधिकार व कर्तव्ये

वन अधिकारी व कर्मचारी यांचेकडून वनक्षेत्राचे संरक्षण व विकासात्मक कामे करण्यांत येतात.

### १. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव)

१. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक यांचेकडे संपूर्ण वनवृत्ताचा प्रशासकीय कार्यभार असतो. त्याचेवर त्यांचे अधिपत्याखालील वन्यजीव क्षेत्राचे संनियंत्रण करण्याची जबाबदारी असते त्यात प्रामुख्याने ...

i) व्यवस्थापन आराखडे तयार करवुन घेणे व त्यानुसार प्रादेशिक कामाचे संनियंत्रण करणे.

ii) त्यांचे वनवृत्तातील खर्च, अग्रिमे, सर्व कामे व त्यांचे करार आणि त्यांचे कार्यक्षेत्राचे संनियंत्रण करणे

iii) वने व वन्यजीव संरक्षण, वन्यजीव पर्यटन व्यवस्थापन, ग्राम परिसर विकास योजना इत्यादीवर संनियंत्रण करणे.

या बाबींचा समावेश असतो.

## २. मुख्य वनसंरक्षक / उपवनसंरक्षक (वन्यजीव)

१. मुख्य वनसंरक्षक / उपवनसंरक्षक यांचेकडे व्याघ्र प्रकल्प क्षेत्राचा किंवा सुरक्षित क्षेत्राचा प्रशासकीय कार्यभार असतो. संबंधित वन्यजीव विभाग कार्यालयाचे ते प्रमुख असतात.

२. त्यांचे विभागातील वन्यजीव व्यवस्थापन, प्रशासन व अस्थापनेवर नियंत्रण ठेवणे.

३. व्यवस्थापन आराखड्याानुसार वने व वन्यजीव व्यवस्थापन, संवर्धन व संरक्षण करणे आणि खर्चावर नियंत्रण ठेवणे.

४. वन्यजीव पर्यटन व्यवस्थापन करणे.

५. ग्राम परिसर विकास योजना कार्यान्वीत करणे, स्थानिक जनतेशी सलोख्याचे संबंध प्रस्थापीत करणे त्याचे प्रबोधन करणे, मानव व वन्यप्राणी संघर्ष होणार नाही, या दृष्टीने कार्यान्वयन करणे.

६. प्रादेशिक वन विभाग, वनविकास महामंडळ, पोलीस विभाग व इतर शासकीय विभाग, अशासकीय संस्था यांचेशी योग्य समन्वय ठेवणे.

## ३. सहाय्यक वनसंरक्षक

१. मुख्य वनसंरक्षक / उपवनसंरक्षक यांना नियमीत कामांमध्ये सहाय्य करणे,

२. वनसंवर्धनाच्या कामाचे निरीक्षण व तपासणी करणे,

३. मुख्य वनसंरक्षक / उपवनसंरक्षक यांचे मार्गदर्शनाखाली मंजूर व्यवस्थापन आराखड्यानुसार वनांचे व्यवस्थापन, संरक्षण त्याची अमंलबजावणी करणे.

४. आस्थापना विषयक विभागीय कामे करणे,

५. वनगुन्हे प्रकरणे अंतिमरित्या निकालात काढणे,

६. वनसंशोधन अधिकारी म्हणून संशोधनाचे कार्यामध्ये नेतृत्व करणे.

७. जनमाहिती अधिकारी.

८. वन्यजीव पर्यटन व्यवस्थापन करणे.

९. ग्राम परिसर विकास योजनेव्दारे स्थानिक लोकांशी सलोख्याचे संबंध स्थापित करून मानव व वन्यप्राणी संघर्ष होणार नाही, या दृष्टीने कार्यान्वयन करणे.

१०. प्रादेशिक वन विभाग, वनविकास महामंडळ, पोलीस विभाग व इतर शासकीय विभाग, अशासकीय संस्था यांचेशी योग्य समन्वय ठेवणे.

## ४. वनक्षेत्रपाल

१. वनपरिक्षेत्र अधिकारी यांचेकडे संपूर्ण वनपरिक्षेत्राचा प्रशासकीय कार्यभार असतो. वन्यजीव गुन्हे प्रकरणांचे अन्वेषण, न्यायालयीन प्रक्रिया पार पाडण्याची जबाबदारी असते.

२. त्यांचे अधिनस्थ वनपाल / वनरक्षकांना दैनंदिन कामकाजात मार्गदर्शन करणे. विविध कामाचे संनियंत्रण करणे व वन / वन्यजीव संबंधातील कायद्यातील तदतुदीबाबत त्यांना अवगत करणे.

३. त्यांचे परिक्षेत्रातील वनाचे व वन्यजीवांचे संरक्षण व विकास यांची जबाबदारी असते.

४. मुख्य वनसंरक्षक/उपवनसंरक्षक / सहाय्यक वनसंरक्षक यांचे मार्गदर्शनाखाली मंजूर व्यवस्थापन आराखड्यानुसार वनांचे व्यवस्थापन, संरक्षण त्याची अमंलबजावणी करणे.

५. वन्यजीव पर्यटन व्यवस्थापन करणे.

६. ग्राम परिसर विकास योजना कार्यान्वीत करणे, स्थानिक जनतेशी सलोख्याचे संबंध प्रस्थापीत करणे, त्याचे प्रबोधन करणे, मानव व वन्यप्राणी संघर्ष होणार नाही, या दृष्टीने कार्यान्वयीत करणे.

७. प्रादेशिक वन विभाग, वनविकास महामंडळ, पोलीस विभाग व इतर शासकीय विभाग, अशासकीय संस्था यांचेशी योग्य समन्वय ठेवणे.

## ५. परिमंडळ अधिकारी (वनपाल)

१. वनपाल यांचेकडे त्यांचे संपूर्ण परिमंडळाचा प्रशासकीय कार्यभार असतो. वन व वन्यजीव संरक्षण, वनगुन्हा अन्वेषण, वनगुन्हयामध्ये नुकसान भरपाई, वसुली, न्यायालयीन कामकाज.

२. त्यांचे परिमंडळातील सर्व कामांना ते जबाबदार असतात. त्यांचे अधिपत्याखालील वनरक्षकांना त्यांची कर्तव्ये, दैनंदिनी व वनहद्दीबाबत माहिती पुरवणे. नियम व अधिनियम व कर्तव्य याबाबत स्पष्टीकरण करणे.

३. वन्यजीव पर्यटन व्यवस्थापन करणे.

४. ग्राम परिसर विकास योजना कार्यान्वीत करणे.

५. स्थानिक लोकांशी सलोख्याचे संबंध स्थापित करणे, त्याचे प्रबोधन करणे, मानव व वन्यप्राणी संघर्ष होणार नाही, या दृष्टीने कार्यान्वयन करणे.

## ६. नियतक्षेत्र अधिकारी (वनरक्षक) -

१. वनरक्षक यांचेकडे त्यांचे नियतक्षेत्राचे संरक्षण व गस्त घालणे.

२. वनहद्दीचे दुरुस्ती व परिरक्षण करणे

३. ग्रामस्थांकडून होणा-या वनातील अतिक्रमणाबाबत दक्षता बाळगणे

४. त्यांचे अधिपत्याखालील नियतक्षेत्रात गुरांना चराई करून न देणे

५. अवैध वृक्षतोड टाळण्यासाठी अधिपत्याखालील नियतक्षेत्रात वारंवार गस्ती घालणे

६. विहित कालावधीत जाळ रेषा घेणे, उंचावरून जाळ ठिकाणाची पहाणी करणे व प्रकरणी कार्यवाही करणे

७. राखीव वनक्षेत्रात अवैध शिकार व वनतळयातील मासेमारी याबाबतचा अहवाल वरिष्ठांस सादर करणे

९. त्यांचे ताब्यातील वनविश्रामगृह व त्यासभोवतीचा परिसर नीट व स्वच्छ ठेवणे

१०. वनगुन्हांचे शोध धेवून प्रथम रिपोर्ट सादर करणे, गुन्हेगाराचा शोध घेणे व कायदेशीर कारवाई करणे.

११. ग्राम परिसर विकास योजना कार्यान्वीत करणे.

१२. स्थानिक लोकांशी सलोख्याचे संबंध स्थापित करणे, त्याचे प्रबोधन करणे, मानव व वन्यप्राणी संघर्ष होणार नाही, या दृष्टीने कार्यान्वयन करणे.

१३. वन्यजीव पर्यटन व्यवस्थापन करणे.

### ७. वनसर्व्हेक्षक-

१. कार्यआयोजनेचे आराखड्यानुसार सिमांकन करणे

२. उपवनसंरक्षक यांचे निर्देशानुसार इतर सर्वेक्षण व सिमांकन करणे.

३. वनक्षेत्राचे गणन व मोजमाप करणे

४. शासन अधिसूचनेनुसार वनक्षेत्राचे नकाशांची दुरूस्ती व नोंदी करणे

५. प्रभावित वनक्षेत्रा संदर्भातील सर्वेक्षण व सिमांकन करणे व त्या संदर्भातील पत्रव्यवहाराची इतिहास पुस्तीका अद्यावत ठेवणे.

६. सर्व्हेक्षणाशी संबंधीत संगणकीकरण विषयक बाबी हाताळणे.

### ८. उप वनअभियंता -

१. इमारती, रस्ते, इतर अभियांत्रिकी कामे यांची संरचना व दुरूस्तीची अंदाजपत्रके तयार करणे व क्षेत्रीय अधिकारी / कर्मचारी यांना त्या संबंधात मार्गदर्शन करणे.

## ३. निर्णय घेण्याची कार्यपध्दती, पर्यवेक्षण व उत्तरदायित्व प्रणाली

वन्यजीवांचे संरक्षण व विकासात्मक कामासाठी वृत्तस्तरावर अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक, विभागीय स्तरावर वनसंरक्षक / उपवनसंरक्षक व क्षेत्रिय स्तरावर वनपरिक्षेत्र अधिकारीऱ्यांचे अधिपत्याखाली नियमांचे अनुषंगाने निर्णय घेतले जातात. ज्या संरक्षित क्षेत्राचे आराखडे मंजुर आहे त्या वनक्षेत्रात मंजुर आराखड्या प्रमाणे कार्यवाही केली जाते.

## ४. कामाचे निकष

वनविभागाचे मुख्य काम वन्यजीव व्यवस्थापन व संरक्षण हे आहे. त्यानुसार वनविभागांची रचना असुन त्यानुसार नियतक्षेत्रावर वनरक्षकांची नेमणुक केलेली असते, व जंगल संरक्षणाकरीता वनरक्षकांची कर्तव्ये निश्चित केलेली आहेत. सदर नियतक्षेत्राच्या वनरक्षकांवर नियंत्रण ठेवणे व आवश्यकतेनुसार मार्गदर्शन करणेकरीता काही नियतक्षेत्रांचा मिळुन परिमंडळ बनविले जाते व ठराविक परिमंडळाचे एक वनपरिक्षेत्र असते हया वनपरिक्षेत्रावर वर्ग २ दर्जाचा वनपरिक्षेत्र अधिकारी असतो तो संपुर्ण परिक्षेत्रावर वनसंरक्षणाचे नियंत्रण करतो.

संरक्षणाशिवाय सुरक्षित क्षेत्रामध्ये विकासाची कामे घेतली जातात. त्यामध्ये प्रामुख्याने वन्यप्राण्यांकरिता कुरण विकास करणे, पानस्थळांचा विकास करणे, इत्यादी कामांचा समावेश होतो. त्या कामावरही वनरक्षक, वनपाल व वनपरिक्षेत्र अधिकारी यांचेमार्फत नियंत्रण ठेवले जाते.

वन संरक्षण करताना किती गुन्हे पकडले, त्यामध्ये किती प्रकरणे निकाली काढली त्याबाबतची अवैध वृक्षतोड, अतिक्रमण, अवैध वाहतुक, वन्यजीव, वनवणवा व इतर गुन्हेकामांची माहिति दर्शविणारा सन २०१०-११ करिताचा अहवाल समवेत समाविष्ठ केलेला आहे.

वन्यजीव पर्यटन हे वन्यजीव व्यवस्थापनात वन्यजीव विषयक अविभाज्य अंग आहे. निसर्ग निर्वचन केंद्र, जनजागरण, विविध प्रशिक्षण कार्यक्रम आयोजीत करण्यात येतात.

**Abstract of Range**

| Sr. No. | Circle | Divn. | Range | Range | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | Normal | Sensitive | Hyper Sensitive | Total |
| 1 | Nagpur (WL) | Pench | 4 | 0 | 0 | 4 | 4 |
| 2 | | Tadoba | 3 | 0 | 3 | 0 | 3 |
| 3 | | Gondia | 2 | 0 | 1 | 1 | 2 |
| 4 | | Allapalli | 2 | 0 | 2 | 0 | 2 |
| | Total - | | 11 | 0 | 6 | 5 | 11 |
| | | | | | | | |

## Abstract of Round

| Sr. No. | Circle | Divn. | Round | Round | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | Normal | Sensitive | Hyper Sensitive | Total |
| 1 | Nagpur | Pench | 7 | 0 | 1 | 6 | 7 |
| 2 | | Tadoba | 9 | 0 | 9 | 0 | 9 |
| 3 | | Gondia | 8 | 0 | 5 | 3 | 8 |
| 4 | | Allapalli | 3 | 0 | 3 | 0 | 3 |
| | Total - | | 27 | 0 | 18 | 9 | 27 |
| | | | | | | | |

## Abstract of Beats

| Sr. No. | Circle | Divn. | Beats | Beats | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | Normal | Sensitive | Hyper Sensitive | Total |
| 1 | Nagpur | Pench | 47 | 0 | 22 | 25 | 47 |
| 2 | | Tadoba | 34 | 0 | 34 | 0 | 34 |
| 3 | | Gondia | 31 | 0 | 15 | 16 | 31 |
| 4 | | Allapalli | 13 | 0 | 11 | 2 | 13 |
| | Total - | | 125 | 0 | 82 | 43 | 125 |

## गोषवारा
## प्रलंबित वनगुन्हयांची स्थिती दर्शविणारे प्रपत्र
## तिमाही कालावधी दिनांक १/१/२०११ ते ३१/३/२०११

| वनगुन्हयाचा प्रकार | तिमाही सुरवाती पर्यंत वनगुन्हे संख्या | चालू तिमाही मध्ये - नोंदविलेल्या वनगुन्हयांची संख्या | एकुण वनगुहे संख्या | चालू तिमाही मध्ये न्यायालयात दाखल केलेल्या गुन्हयांची संख्या | चालू तिमाहीमध्ये ािकाली काढण्यांत आलेल्या वागुहयांची संख्या | | | तिमाही अखेर प्रलंबित वागुहे संख्या | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | विभागाो निकाली कढलेल्या वन गुन्हयांची संख्या | यायालयाो निकाली काढलेल्या वन गन्हयांची संख्या | एकुण निकाली काढलेल्या वनगुन्हयांची संख्या | चौकशी वर | सक्षम अधिका-यांच्या आदेशा करीता प्रलंबित | वसुली वर | न्याया लयात | एकुण |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ | १३ |
| अवैध वृक्षतोड | 717 | 161 | 878 | 1 | 356 | 73 | 429 | 95 | 0 | 141 | 213 | 449 |
| अतिक्रमण | 403 | 1 | 404 | 1 | 1 | 0 | 1 | 125 | 238 | 0 | 40 | 403 |
| अवैध वाहतुक | 4 | 2 | 6 | 2 | 0 | 1 | 1 | 1 | 0 | 0 | 4 | 5 |
| वयजीव | 95 | 4 | 99 | 1 | 3 | 28 | 31 | 7 | 2 | 0 | 59 | 68 |
| वनवणवा | 54 | 85 | 139 | 0 | 41 | 0 | 41 | 95 | 0 | 0 | 3 | 98 |
| अवैध चराई | 23 | 0 | 23 | 0 | 3 | 0 | 3 | 13 | 0 | 0 | 7 | 20 |
| अवैध मासेमारी | 138 | 2 | 140 | 0 | 0 | 3 | 3 | 9 | 0 | 0 | 128 | 137 |
| इतर | 60 | 3 | 63 | 0 | 5 | 11 | 16 | 31 | 0 | 0 | 16 | 47 |

## **५. कार्ये पार पाडण्यासाठी वापरावयाचे नियम/कायदे**

वनक्षेत्राचे संरक्षण प्रभावीपणे करणे याकरिता वनकर्मचा-यांना शासनाने अधिकार प्रदान केलेले आहेत. कर्तव्ये पार पाडताना वनकर्मचारी शासनाने वनविभागाकरीता निश्चित केलेल्या खालील नियमांचा वापर करतात.

१) वन्यजीव संरक्षण कायदा १९७२ आणि त्याचेवरील त्यावरील अनुषंगिक नियम व मार्गदर्शक सूचना.

२) भारतीय वन अधिनियम १९२७

३) साईटीस १९७५

४) वित्तीय अधिकार खंड १९७८

५) वन (संरक्षण) कायदा १९८०

६) महाराष्ट्र नागरी सेवा नियम

## **६. विभागामधील कागदपत्रांच्या वर्गवारीचे विवरणपत्र**

विभागातील कागदपत्रांची वर्गवारी कक्षवार करण्यांत येवून प्रत्येक कक्षातील कागदपत्र वाटप केल्यानंतर त्या त्या कक्षाकडे ठेवण्यांत येणा-या कार्यविवरणात त्याची नोंद घेण्यांत येते. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक, (वन्यजीव) पुर्व, नागपूर यांचे कार्यालयात १ ते ६ कक्ष आहेत व त्यानुसार कागदपत्राचे वाटप करून प्रत्येक पत्राचे अनुषंगिक संबंधित कक्षाकडून कार्यवाही करण्यांत येते.

वरील प्रमाणे (वन्यजीव), नागपूर वनवृत्तांतर्गत इतर ४ वनविभागामध्ये कक्ष पध्दती अवलंबिविली जाते, कक्षवार कार्यविवरण ठेवून कागदपत्रांची वर्गवारी केली जाते.

## ७. धोरण तयार करण्याच्या किंवा अंमलबजावणी प्रक्रियेमध्ये जनतेच्या सहभागासाठी केलेली उपाययोजना

वनाचे व वन्यजीवाचे संरक्षण करणे हे वनविभागाचे आद्य कर्तव्ये आहे, त्याकरिता शासनाने नियम तयार केलेले आहेत व त्याची अंमलबजावणी करण्याकरिता आवश्यक अधिकार संबंधित कर्मचा-यांना दिलेले आहेत. ग्रामपरिसर विकास योजना अस्तित्वात आहे. या योजनेनुसार ग्रामस्थांना विश्वासात घेऊन त्यांच्या मदतीने व सहकार्यातुन वनसंरक्षणाच्या व विकासाच्या योजना राबविण्यात येतात.

## ८. सल्ला देण्यासाठी स्थापन केलेली मंडळे/समित्या/परिषद याबाबतची माहिती

१) राज्य वन्यजीव मंडळ

२) राज्यस्तरीय व्याघ्र कक्ष

३) व्याघ्र संनियंत्रण समिती

## ९. अधिकारी व कर्मचाऱ्यांची निर्देशिका

या वनवृत्तात कार्यरत कर्मचारी संबंधित प्रादेशिक वनवृत्ताच्या आस्थापनेवर असतात. त्यामुळे या वृत्तस्तरावरुन कोणत्याही अधिकारी / कर्मचारी संवर्गाची जेष्ठता यादी प्रसिध्द केल्या जात नाही.

## १०. प्रत्येक कर्मचा-यांचे मासिक वेतन, प्रतिपुर्ती बाबतची कार्यपध्दती

कर्मचा-यांची मासिक वेतन देयके तयार करण्यांत येवून कोषागार अधिकारी, नागपूर यांचेकडून प्रमाणित करण्यांत आल्यानंतर सदर रक्कम धनादेशाव्दारे बॅकेत जमा करण्यांत येते व बॅकेकडून प्रत्येक कर्मचा-यांचे वेतनाची रक्कम संबंधिताचे खात्यात जमा केली जाते.

प्रतिपूर्ती प्रकरणी कर्मचा-यांकडून प्राप्त होणारी वैद्यकीय देयके संबंधितांना उपरोक्त कार्यपध्दतीनुसार अदा केली जातात. उपरोक्त पध्दत हया वृत्ताअंतर्गत असणा-या सर्व विभागीय कार्यालयामध्ये अवलंबिली जाते.

## ११. सर्व योजनांचा तपशील, प्रस्तावित खर्च अर्थसंकल्प, संवितरीत रक्कम

नागपूर वन्यजीव वृत्तामध्ये सन २०१०-११ मध्ये कार्यरत असलेल्या योजना / अर्थसंकल्पीय तरतुद व त्या योजनांवर मार्च २०११ अखेर झालेला खर्च दर्शविणारे विवरणपत्र समवेत समाविष्ट केलेले आहे.

| अ क्र | योजनेचे नांव | योजनेचा तपशिल | सन २०१०-११ ची तरतुद रु. | | | माहे मार्च २०११ अखेर | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | नियतव्यय | आवश्यक अनुदान | प्राप्त अनुदान | | |
| | | **केंद्र पुरस्कृत / राज्यस्तरीय योजना चालू बाब प्रस्ताव** | | | | **(आकडे हजारात)** | |
| १ | केंद्र पुरस्कृत योजना | केंद्र पुरस्कृत योजना (००) (०३) वन्यजीव व्यवस्थापन आणि संरक्षण (५०% केंद्रीय अनुदान) (२४०६-०७८४) | १५०५६ | १५०५६ | १५०५६ | १४८९३ | प्राप्त अनुदाना नुसार खर्च झाले आहे. |
| २ | राज्यस्तरीय वार्षीक योजना | केंद्र पुरस्कृत योजना (००)(०४) वन्यजीव व्यवस्थापन आणि संरक्षण (१००% केंद्रीय अनुदान) (२४०६-१२४३) | २६३४९ | २६३४९ | २६३४९ | १९२४५ | |
| | | केंद्र पुरस्कृत योजना (००)(०५) व्याघ्र प्रकल्प क्षेत्रात परिसर विकास (१००% केंद्रीय अनुदान) (२४०६-१४९५) | ६१५ | ६१५ | ६१५ | ३७९ | |
| | | केंद्र पुरस्कृत योजना (००)(०३) वन्यजीव व्यवस्थापन आणि संरक्षण (५०% केंद्रीय अनुदान) (२४०६-२३८४) | १५११० | १५११० | १५११० | १४९१४ | |
| | | राज्य योजना अंतर्गत योजना ८००(०२)(०५) वनक्षेत्रात पर्यटन विकास कार्यक्रम (२४०६-२२९५) | ९००० | ९००० | ९००० | ८९९५ | |
| | | ११ (२२) १२ व्या वित्त आयोगाच्या शिफारशीनूसार जंगल संपत्तीचे परिरक्षणाकरिता केंद्रीय सहाय्य (दत्तमत्त) २४०६-२०७२ | १९४४ | १९४४ | १९४४ | ९८९ | |
| | | १३ व्या वित्त आयोगाच्या शिफारशीनुसार वनाचे व्यवस्थापन या करीता केंद्रीय सहाय्य (२४०६ ७२२३) | २८३० | २८३० | २८३० | २८३० | |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | निसर्ग संरक्षण व वन्यजीव व्यवस्थापन (वन्यपशु व निसर्ग संरक्षण योजना) (२४०६ २२२१) | ९०० | ९०० | ९०० | ९०० | |
| | | **एकुण** | **७१८०४** | **७१८०४** | **७१८०४** | **६३१४५** | |

(रूपये हजारात)

| अ क्र | योजनेचे नांव | योजनेचा तपशिल | सन २०१०-११ ची तरतुद रु. | | | माहे मार्च ११ अखेर | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | नियतव्यय | आवश्यक अनुदान | प्राप्त अनुदान | | |
| १ | २४०६ वनीकरण व वन्यजीवन, योजनेत्तर | | | | | | |
| | | ०१ वनीकरण, ००१ निर्देशन व प्रशासन ००१(०२) प्रादेशिक वनसंरक्षक (२४०६ ००४२) | २८८ | २८८ | २८८ | २८५ | |
| २ | | ०७०- दळणवळण व इमारती ०७० (दोन) रस्ते व पुल दुरूस्ती (२४०६ ००७८) | १९०६ | १९०६ | १९०६ | १७१३ | |
| ३ | | ०७० (चार) इमारती दुरुस्ती (२४०६ ००८७) | १२७० | १२७० | १२७० | १२३९ | |
| ४ | | ००१ संधारण व विकास ००१ (एक) प्रशासन व संरक्षण (२४०६ ००९६) | ३६०९९ | ३६०९९ | ३६०९९ | ३१५४३ | |
| ५ | | १०१ (दोन) वनाचे संरक्षण जमाबंदी व सिमांकण (२४०६ ०१०२) | १९४७ | १९४७ | १९४७ | १८७५ | |
| ६ | | १०१ (तीन) (दोन) कृत्रिम पुनर्निर्मिती (२४०६ ०१२२) | १३८१ | १३८१ | १३८१ | १३५९ | |
| ७ | | १०१ (चार) अग्नीपासुन वनाचे संरक्षण (२४०६ ०१३१) | ८९११ | ८७८३ | ८९११ | ८७८३ | |
| ८ | | १०५ (एक) (सी) शासकीय अभिकरणाकडून समुपयोजन (इमारती लाकुड) (२४०६ ०४७२) | ६०० | ६०० | १०९६ | ६०० | |
| ९ | | ८०० (चार) वन उपवने (२४०६ ०६५९) | ७७१५ | ७७१५ | ७७१५ | ७३८७ | |
| १० | | १०१ वन्यजीवन (एक) निसर्ग संवर्धन व वन्यपशु संरक्षण (२४०६ ०७६६) | ५६०८६ | ५६०८६ | ५६०८६ | ४८५७८ | |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ११ | | २४०६-०१ मागणी क्र. सी-१७ १०१ (२) वन मजुरांच्या अधिंसख्य पदाची निर्मिती (२४०६ १८९८) | ३४६९३ | ३४६९३ | ३४६९३ | २६४८५ | |

टिप : ०१-वेतनाचे व ११-प्रवास खर्चाचे मार्च २०११ अखेरचे ताळमेळ महालेखाकार यांचे कडून अप्राप्त असल्याने वेतन व प्रवास खर्चात कमी जास्त होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

## १२. लाभार्थीबाबतची माहिति

**वन्यप्राण्यांच्या हल्ल्यामुळे मनुष्य किंवा पाळीव प्राणी जखमी/मृत झाल्यास द्यावयाची नुकसान भरपाई** :

शासन निर्णय क्रमांक डब्ल्युएलपी-१००२/प्रक्र-२५८/फ-१, दिनांक १७.१.२००३ अवये वन्यप्राण्यांकडून मानवी जिवितास किंवा पाळीव जनाव जखमी / मृत झाल्यास नुकसान भरपाई देण्यात येते.

**वन्यप्राण्यांकडून शेत पिकाचे नुकसान झाल्यास द्यावयाची भरपाई** :

शासन निर्णय क्रमांक डब्ल्युएलपी-१०९४/प्रक्र-११५/फ-१, दिनांक २८.३.२००४ अवये वन्यप्राण्यांकडून शेत पिकास हानी झाल्यास नुकसान भरपाई देण्यात येते.

या कार्यालया अंतर्गत येणाऱ्या विभागीय कार्यालयामार्फत याबाबत कार्यवाही केल्या जाते.

## १३.ज्या व्यक्तींना सवलती पध्दत लाभार्थीबाबतची माहीती

या वनवृत्तामध्ये अश्या प्रकारच्या कोणत्याही योजना नाही.

## १४. इलेक्ट्रॉनिक स्वरुपात उपलब्ध असलेली माहिती

वन्यजीव, नागपूर वनवृत्तांतर्गत असलेल्या कार्यालयामध्ये खालील माहिती ही इलेक्ट्रॉनिक स्वरूपात उपलब्ध आहे.

१) संपूर्ण वनवृत्ताचा लेखा सारांश.

२) वनवृत्तांत नियुक्त केलेले माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी यांची नावे व पदनामे यांची यादी.

३) वनवृत्तांकडून वरीष्ठ कार्यालयाकडे जाणारे सर्व प्रकारचे अद्ययावत मासिक तथा त्रैमासिक अहवाल.

४) मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव) नागपूर, यांचे कार्यालयात काम करणाऱ्या सर्व कर्मचारी व अधिकारी यांचा सेवापुस्तकातील तपशील.

५) विधानसभा व विधानपरिषद प्रश्नांशी संबंधित पुरविण्यांत आलेली माहिती.

## १५. लायब्रीसह नागरिकांना माहिती मिळणेसाठी दिलेल्या सुविधा

कोणत्याही नागरिकांस त्यांनी समक्ष अथवा लेखी माहिती मागणी केल्यास मागणी केलेली उपलब्ध माहिती संबंधिताना देण्यात येते.

## **१६. (वन्यजीव), नागपूर वनवृत्तातील माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी यांची नाव व पदनामे**

| अ. क्र. | कार्यालयाचे नाव व पत्ता दुरध्वनी/फॅक्स क्रमांक | माहिती अधिकारी यांचे नांव व हुद्दा | अपिलीय अधिकारी यांचे नांव व हुद्दा |
|---|---|---|---|
| १. | अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक, (वन्यजीव) पुर्व, नागपूर यांचे कार्यालय, झिरो माईल्स, सिव्हील लाईन्स, नागपूर-०१ दूरध्वनी क्र ०७१२-२५६०९५३, २५५२५१८ | श्री किशोर मिश्रीकोटकर सहाय्यक वनसंरक्षक (वन्यजीव), नागपूर | श्री. ए. के. सक्सेना अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक, (वन्यजीव) पुर्व, नागपूर |
| २ | मुख्य वनसंरक्षक तथा क्षेत्रसंचालक, पेंच व्याघ्र प्रकल्प, नागपूर यांचे कार्यालय झिरो माईल्स, सिव्हील लाईन्स, नागपूर-४४०००१ दूरध्वनी क्र ०७१२-२५६०७२७, २५६०७४८ | श्री जी. के. वशिष्ठ, सहाय्यक वनसंरक्षक, नागपूर | श्री. ए. अशरफ, मुख्य वनसंरक्षक तथा क्षेत्रसंचालक, पेंच व्याघ्र प्रकल्प, नागपूर |
| ३. | मुख्य वनसंरक्षक तथा क्षेत्रसंचालक, ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्प, चंद्रपूर यांचे कार्यालय माता मंदीर समोर, मुल रोड, चंद्रपूर दूरध्वनी क्र ०७१७२-२५१४१४, २७७११६ | श्री. अजय पिल्लारी सेठ सहाय्यक वनसंरक्षक, ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्प, चंद्रपूर | श्री. व्ही. के. सिन्हा मुख्य वनसंरक्षक तथा क्षेत्रसंचालक, ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्प, चंद्रपुर. |
| ४. | उपवनसंरक्षक, (वन्यजीव), गोंदिया बोपचे बिल्डींग, युनियन बँकेच्या बाजुला, बालाघाट रोड, गोंदिया-१४ फोन नं. ०७१८२-२५१२३२, २५१२५० | श्री. एन. ए. खान, वनपरिक्षेत्र अधिकारी (संरक्षण) | श्री. ए. एस. कळसकर उपवनसंरक्षक, (वन्यजीव), गोंदिया |
| ५. | उपवनसंरक्षक (वन्यजीव), आलापल्ली रेंजर कॉलेज परिसर, मुल रोड, चंद्रपूर फोन नं. ०७१७२-२५५९८० | श्री. आर. के. वसावे, सहाय्यक वनसंरक्षक चपराळा अभयारण्य | श्री. एस. रमेश कुमार, उपवनसंरक्षक, (वन्यजीव), आलापल्ली, स्थित-चंद्रपूर |

## **१७ इतर माहिती**